शुक्रवार दि.२८ मार्च २०२५
हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# कुणाल कामरा कोणत्याही बिळात लपला, तरी त्याला प्रसाद देणार

## मंत्री शंभूराज देसाई यांचा टायरमध्ये घालून थर्ड डिग्री देण्याचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या विडंबनात्मक गीतामुळे कॉमेडियन कुणाल कामरा चांगलाच अडचणीत सापडला आहे. एकीकडे पोलिस या प्रकरणी त्याच्यावर कडक कारवाई करण्याची तयारी करत आहेत, तर दुसरीकडे शिवसैनिकांनीही त्याला धडा शिकवण्याचा निर्धार केला आहे. त्यातच आता शिवसेना नेते तथा मंत्री शंभूराज देसाई यांनीही त्याला कोणत्याही बिळात लपला तरी त्याला प्रसाद देण्याचा इशारा दिला आहे.स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या एका विडंबनात्मक गाण्याचे राज्याचे वातावरण तापले आहे. या प्रकरणी शिवसैनिकांनी कुणाल कामराच्या हॅबिटेट स्टुडिओची तोडफोड केली. दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कामराला माफी मागण्याचा अन्यथा कडक कारवाईला सामोरे जाण्याचा इशारा दिला. या पार्श्वभूमीवर शंभूराज देसाई यांनी कुणाल कामराला उपरोक्त इशारा दिला आहे. कुणाल कामरा कोणत्याही बिळात लपला तरी आम्ही त्याला शोधून काढू. आम्हाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोखले आहे. अन्यथा शिवसैनिकांना त्याला रस्त्यावर खेचून प्रसाद देण्यास वेळ लागणार नाही.



कुणाल कामराने मर्यादा ओलांडली आहे. पाणी डोक्यावरून वाहत आहे. आता त्याला प्रसाद देण्याची वेळ आली आहे. शिवसैनिकांनी त्याच्या स्टुडिओत प्रसाद दिला. आता तो मुद्दाम रोज एक नवा व्हिडिओ पोस्ट करत आहे. तो हे जाणीवपूर्वक करत आहे. त्यामुळे आता तो कोणत्याही बिळात लपला तरी त्याला तेथून बाहेर काढून रस्त्यावर पटकवले जाईल. त्याला टायरमध्ये घालून थर्ड डिग्री दिली जाईल.कुणाल कामराने अगोदर एकनाथ शिंदे यांची बदनामी केली. त्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची बदनामी केली. तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी चुकीचे शब्द वापरले. सुप्रीम कोर्टावरही चुकीचे विधान केले. त्यामुळे आता शिवसैनिकांनी त्याला आपल्या भाषेत उत्तर देण्याची वेळ आली आहे. आम्ही मंत्री आहोत, पण तत्पूर्वी शिवसैनिक आहोत. आमची सहनशीलता आता संपली आहे. आम्ही त्याला आमच्याच भाषेत उत्तर देऊ. कामराने कुठे भेटायचे हे सांगावे. शिवसैनिक त्याला तिथे जाऊन प्रसाद देतील.स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. त्यात त्याने 'दिल तो पागल है' या बॉलिवूड चित्रपटातील गाण्यावर एक विडंबन केले होते. त्याद्वारे त्यांनी शिवसेनेतील बंडखोरीवर भाष्य केले होते. विशेषतः गद्दार म्हणत त्यांनी एकप्रकारे एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. पण त्याने आपल्या गाण्यात कुठेही त्यांचे नाव ईघेतले नव्हते. त्याच्या या व्हिडिओमुळे संतापलेल्या शिवसैनिकांनी त्याच्या हॅबिटेट स्टुडिओची तोडफोड केली होती.


# श्री क्षेत्र तुळापूर येथे धर्मवीर छत्रपती श्री.संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

पुणे जिल्हा परिषद,पंचायत समिती हवेली व श्रीक्षेत्र तुळापूर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर, छत्रपती श्री. संभाजी महाराज यांच्या ३३६ व्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी दि.२९ मार्च २०२५ रोजी श्रीक्षेत्र तुळापूर ता.( हवेली ) येथे धर्मवीर, छत्रपती श्री संभाजी महाराजांची शासकीय पूजा व मानवंदनेसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

३३६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री नितेश राणे, मा.जयंत पाटील, तसेच खासदार उदयनराजे भोसले,शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील,शिरूर हवेली मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर कटके, पुणे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रदिपदादा कंद, रोहिदास शेठ उंद्रे, चेअरमन सुभाषआप्पा जगताप, पै.संदीपआप्पा भोंडवे, रवींद्र कंद आदिंसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



कार्यक्रमाबाबत तुळापूर ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. त्यानुसार सकाळी आठ वाजता मुख पदयात्रा, नऊ वाजता जिल्हाधिका- यांच्या हस्ते शासकीय महापुजा, अकरा वाजता शासकीय पुजा व पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना, साडेअकरा वाजता धर्मवीर, शंभूराजे पालखीचे आगमन व स्वागत, दरम्यानच्या काळात शाहिरी कार्यक्रम पोवाडे व शिवव्याख्यान असे कार्यक्रम होणार आहेत.

दुपारी बारा वाजता समाधीस्थळावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.येणाऱ्या शंभू भक्तांसाठी तुळापूर ग्रामपंचायत व शंभूराजे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नप्रसाद, दर्शन व्यवस्था व पार्किंगबाबत लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांनी नियोजन केले आहे. तसेच प्रांताधिकारी यशवंत माने, हवेलीच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते व गटविकास अधिकारी भूषण जोशी, यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे.यावेळी तुळापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच ड.गुंफा इंगळे, माजी सरपंच ज्ञानेश्वर शिवले, माजी सरपंच रुपेश शिवले, माजी उपसरपंच नवनाथ शिवले, शंभूराजे चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजी शिवले, उपाध्यक्ष संजय बंडू शिवले,सचिव अमोल शिवले,संचालक हनुमंत शिवले, विजय शिवले व तुळापूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवरायांचा गौरवशाली इतिहास होणार अजरामर! आ.आनंदराव पाटील बोंढारकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याची अखंड प्रेरणा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास भविष्यातील प्रत्येक पिढीला स्फूर्ती देत राहावा, यासाठी महायुती सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे! पन्हाळागड किल्ल्यावर भव्य शिवस्मारक उभारणीस मंजुरी देण्यात आली असून, या भव्य स्मारकासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ही केवळ स्मारक उभारणी नसून, हा शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याच्या महत्तेचा जागर आहे! पन्हाळा किल्ला, ज्याने अनेक ऐतिहासिक लढाया पाहिल्या, जिथे बाजीप्रभू देशपांडे यांचा अजरामर पराक्रम घडला, तो किल्ला आता शिवस्मारकाच्या रूपाने नव्या तेजाने उजळून



निघणार आहे. हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार! आ.आनंदराव पाटील बोंढारकर विधानसभा सदस्य दक्षिण नांदेड.

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या ई–ऑफिस प्रणालीला दुसरा क्रमांक

## सहा लक्ष रुपयांचे राज्यस्तरीय पारितोषिक जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

वर्धा येथे जिल्हाधिकारी असताना राहुल कर्डिले यांनी संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील महसूल विभागात राबविलेल्या ई – ऑफिस प्रणालीची दखल राज्य शासनाने घेतली आहे. २०२४–२५ च्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात या उल्लेखनीय कार्याला पुरस्कृत करण्यात आले असून राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

नवीन तंत्रज्ञानामुळे प्रशासनाच्या कामात नवनवीन बदल करणे आवश्यक ठरते. वर्ध्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्हाधिकारी वर्धा कार्यालयात ई–ऑफिस प्रणाली सन २०२३–२४ मध्ये यशस्वीरित्या राबविली. यामुळे प्रशासकीय कामकाजात सुलभता आली. या उल्लेखनिय कार्याची दखल घेवून राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान २०२३–२४ स्पर्धेत वर्ध्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी व आताचे नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कार्य कर्तृत्वाला द्वितीय पारितोषिक जाहिर झाले आहे. विभागीय स्तरावरील निवड समित्यांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या गटामध्ये ही निवड करण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्याच्या तालुकास्तरावर देखील त्यांनी ई –ऑफिस प्रणाली सुरू केली होती. त्यामुळे फायलींचा पसारा कमी करण्यात मदत झाली. नांदेडमध्येही त्यांनी या अभियानाला सुरुवात केली आहे.संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील महसूल विभागात ई–ऑफिस प्रणाली राबविण्याबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



यांना ६ लक्ष रुपयांचे द्वितीय राज्यस्तरीय पारितोषिक शासनाच्यावतीने जाहीर झाले आहे. महसूली विभागातील बदलत्या नवीन तंत्रज्ञानामुळे व जागतिकरणामुळे प्रशासनाच्यामध्ये मोठया प्रमाणात बदल करणे आवश्यक असते. त्यानुसार प्रशासनातील सेवांच्या गुणवत्तेत वाढ, लोकाभिमुखता व निर्णयशिलता आणण्यासाठी तसेच सर्वाच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान व स्पर्धा आयोजित केली जाते. या गटात अवैध गौन खनिज उत्पादन आणि वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकरिता केलेल्या प्रयोगासाठी अहिल्यानगरला प्रथम पुरस्कार. तर नगर परिषद कार्यालयाकरिता सोलार प्रकल्प कार्यान्वित केल्या प्रकरणी लातूर जिल्ह्यातील निलंगा नगर परिषदेला तृतीय पुरस्कार मिळाला आहे.

# बाचोटी कॅम्प ग्रा.पं.सदस्या आशा वाघमारे यांना विभागीय आयुक्त यांची क्लीन चिट

## अशा वाघमारे ग्रामपंचायत सदस्यपदी कायम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

तालुक्यातील मौजे ताटकळवाडी ग्रामपंचायत बाचोटी कॅम्प येथील सदस्या आशा वाघमारे यांना विभागीय आयुक्त संभाजीनगर यांनी निकाल देत ग्रामपंचायत सदस्य पदी कायम ठेवण्याचे आदेश देऊन क्लीन चिट दिली आहे. या बाबत थोडक्यात माहिती अशी की ग्रामपंचायत सदस्या आशा वाघमारे यांनी ग्रामपंचायतीच्या शासकीय जागेवर अतिक्रमण केले म्हणून जिल्हा अधिकारी यांच्या कडे २०२४ मध्ये संग्राम वाघमारे व मचिंद्र पागे या दोघांनी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या आधारे जिल्हाधिकारी नांदेड यांनी गटविकास अधिकारी यांना स्थळ चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

गटविकास अधिकारी भोकर यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण असल्याचा अहवाल सादर केला होता.त्या आधारे जिल्हाधिकारी नांदेड व अप्पर विभागीय आयुक्त संभाजीनगर यांनी १० मार्च २०२४ रोजी आशा वाघमारे यांना सदस्य पदी अपात्र ठरविले होते.

अपात्र ठरविल्या नंतर वाघमारे यांनी या निर्णयावर नारजी व्यक्त करत संभाजीनगर खंडपीठात अपील दाखल केली असता या खंडपीठाने दि.१० एप्रिल २०२४ रोजी अपात्रतेला स्थगीती दिली होती.त्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व भुमी अभिलेख विभागाला स्थळ पहाणीसाठी आदेशीत केले असता स्थळ पाणीसाठी जायमोक्यावर जाऊन पहाणी केली असता कुठल्याही प्रकारचे अतिक्रमणं दिसत नसल्याचे व सदस्य यांचे सासरे,दिर हे सगळे विभक्त राहत असल्याचा अहवाल सादर केला असता सर्व बाबीची पडताळणी करुन दि.५ मार्च २०२५ रोजी विभागीय आयुक्त संभाजीनगर यांच्या न्यायालयाने आशा वाघमारे यांना क्लीन चिट देत त्यांचा अर्ज मान्य केला असुन त्यांना सदस्य पदी कायम ठेवण्याचे आदेश नांदेड जिल्हाधिकारी व सर्व संबंधितांना दिले आहेत.त्यामुळे आशा वाघमारे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# जमीन नोंद घोटाळा आला अंगलट श्रीगोंद्याच्या तहसीलदार क्षितीजा वाघमारे व नायब तहसीलदार अमोल बन निलंबित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तहसीलदार सौ क्षितीजा वाघमारे व श्री.अमोल बन, महसूल नायब तहसिलदार, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांनी दि कॉन्फरन्स ऑफ चर्चेस ऑफ खाईस्ट इतर वेस्टर्न इंडिया या संस्थेचे नाव कमी करुन द कॅनेडीयन प्रेस ब्रिटेरियन मिशन करीता खाजगी व्यक्ती यांचे नावे मालकी हक्काचे आदेश करण्यात येऊन अनियमितता केल्याने महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार, एका संस्थेचे नाव बदलून खाजगी व्यक्तींना मालकी हक्क बहाल करण्याच्या प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाल्याने शासकीय आदेशात अनियमितता केल्याच्या आरोपावरून श्रीगोंद्याच्या तहसीलदार सौ क्षितीजा वाघमारे व नायब तहसीलदार श्री अमोल बन यांना महाराष्ट्र शासनाने निलंबित केले आहे. शासकीय कर्तव्यात कसूर केल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ व शिस्त व अपील नियम १९७९ नुसार त्यांच्यावर विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. निलंबनाच्या कालावधीत त्यांचे मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर राहील व तहसीलदार सौ क्षितीजा वाघमारे व नायब तहसीलदार अमोल बन यांना पुढील आदेश येईपर्यंत मुख्यालय सोडू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.त्यांना शासन नियमानुसार निलंबन निर्वाह भत्ता मिळणार आहे. तसेच, त्यांना कोणतीही खाजगी नोकरी, व्यवसाय अथवा व्यापार करता येणार नाही.



# संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूल देगलूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा






लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

संस्कृती डिजिटल शाळा देगलूर येथे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. शाळा ज्ञानदाना बरोबरच सुसंस्काराचे केंद्र आहे. शाळेत शिक्षक ज्ञानाबरोबरच सुसंस्कार करण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांवर परिपूर्ण संस्कार करण्यासाठी शाळा आणि पालकांचेही आवश्यक शिक्षकांना सहकार्य असते. असे प्रतिपादन वीरुपाक्ष महाराज मुखेडकर यांनी केले. ते येथील डिजिटल स्कूलमध्ये आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार उपस्थित होते.दि.२४ मार्च रोजी शहरातील अतिशय अल्पकाळात नावारुपाला आलेल्या संस्कृती डिजिटल स्कूलचा 'ओळख महापुरुषांची यशोगाथा' हा विशेष वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम चिद्रावार मिल,मैदानावर आयोजित करण्यात आला होता. सरस्वती पूजनानंतर विद्यालयाच्या संचालिका स्वाती बोडके यांनी विद्यालयाने आजपर्यंत केलेल्या कार्याचा संक्षिप्त अहवाल सादर केला. याप्रसंगी पुढे बोलताना वीरुपाक्ष महाराज म्हणाले की, इंग्रजी भाषेतून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे; परंतु इंग्रजी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना प्राचीन सनातन संस्कृतीचेही शिक्षण देणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार म्हणाले की, श्रीमंतांची मुले चांगले शिक्षण मिळावे म्हणून शहरातील नावाजलेल्या शाळेत शिकण्यासाठी जातात; परंतु गोरगरीब, सामान्य आर्थिक परिस्थितीत असलेल्या नागरिकांची मुले शिक्षणापासून राहतात. शंकरराव दर्जेदार वंचित बोडके सरांनी सुरू केलेल्या संस्कृती डिजिटल शाळेच्या माध्यमातून मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळत असल्यामुळे यापुढे गोरगरीब, सर्वसामान्य पालकांच्या मुलांना चांगल्या शिक्षणासाठी मोठ्या शहरात जाऊन राहण्याची गरज नाही. याप्रसंगी विद्यालयातील चिमुकल्यांनी गणेश वंदनेनंतर प्रथम महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, अनाथांची आई सिंधुताई सपकाळ, लावणी सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर, गानसम्राज्ञीलता मंगेशकर, श्रीदेवी यांना मानवंदना देणारा कार्यक्रम सादर केला. छावा थीम, हिरकणी थीम, स्पोर्टस टीम आदी अनेक उत्कृष्ट कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थित प्रचंड जनसमुदायाची मने जिंकली. अतुल सर यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ऍड. अंकुश देसाई देगावकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील थडके, सौ. विजयमाला बोडके, माधवराव बोडके, केंद्रप्रमुख पांचाळ, डॉ. झरीकर, संभाजी पाटील सुगावकर, राजमोडे, राजू पाटील मलकापूरकर, माधवसिंग ठाकूर, विशाल पवार, प्रा.निवृत्ती भागवत, ऍड. रमेश जाधव यांच्यासह जवळपास चार हजारावर पालक, नागरिक, व्यापारी, शिक्षक, डॉक्टर, पत्रकार, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपाश्री सूर्यवंशी व विजयालक्ष्मी झरे यांनी केले तर आभार संस्थाचालक शंकरराव बोडके यांनी मानले.

# छावा संघटनेकडून तालुक्यातील नागरिकांना दिलासा-विविध बाबींवर उपाय योजना

## तहसिल कार्यालयात नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

दि. २६ रोजी अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न माध्यमांशी संवाद साधताना त्रिव संताप व्यक्त केला होता. त्या संदर्भात दिनांक २७ मार्च रोजी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले त्या क्षणी तहसीलदार यांच्याशी निवेदन देण्यापूर्वी निवेदनात नमूद मागण्या तात्काळ मान्य करा, गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांसाठी पिण्याची पाण्याची व्यवस्था नाही,वृद्ध नागरिकांची पाण्याअभावी तहसील कार्यालयात गैरसोय होत असल्याचे छावा संघटनेच्या निदर्शनास आल्यामुळे,भविष्यात निर्माण होणाऱ्या गंभीर बाबींवर लक्ष देऊन उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.आपण याची दखल घ्यायला हवी होती परंतु का घेतली नाही आता तर उष्णतेचा पार चढत असल्याने नागरिकांची पिण्याच्या पाण्याअभावी गैरसोय होत आहे यावर अशोक राजे जाधव यांच्याशी चर्चेदरम्यान तहसीलदार यांनी तात्काळ मागणी मान्य करून तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित होणार नाही हा शब्द दिला असल्याने आपण या प्रकारचे तात्काळ निर्णय घेत राहा हीच अपेक्षा अशोक राजे जाधव यांनी छावा संघटनेच्या वतीने व्यक्त केली.






छावा संघटनेच्या निवेदनाची दखल घेतल्यामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. वारंवार नागरिकांच्या अडचणी सोडवताना छावा संघटना आक्रमक भूमिका घेतांना दिसत आहे. याच आक्रमक भूमिकेमुळे नागरिकांना दिलासा मिळत आहे. छावा संघटनेच्या वतीने नेहमीच नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा काम पर्यंत सुरू राहतील असा आशावाद छावा चे जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी दैनिक लोकनेता शी बोलतांनी व्यक्त केला.

निवेदन देता क्षणी कृष्णा कोल्हे जिल्हा कार्याध्यक्ष अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा,बाळासाहेब शेळके विधानसभा अध्यक्ष अखिल भारतीय छावा संघटना मातृतीर्थ सिंदखेड राजा,रफीक सैय्यद प्रसिद्धीप्रमुख अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा,नारायण मस्के सोशल मीडिया प्रमुख अखिल भारतीय छावा संघटना देऊळगाव राजा यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थी जीवनात असताना अभ्यास केल्यास उत्तुंग यश प्राप्त होते-डॉ.अजयदादा धोंडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**




आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च आष्टी(डी,बी अँड एम फार्मसी )या फार्मसी कॉलेजमध्ये नुकतेच रिदम (ताल) फार्मा फेस्टिवल २०२५ संपन्न झाले,रविवार दिनांक २३ मार्च २०२५ स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण,सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अजय दादा धोंडे सहसचिव आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.डी बी राऊत प्रशासन अधिकारी आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी व डॉ. चंद्रकांत गोसावी प्राचार्य महेश आयुर्वेद महाविद्यालय आष्टी हे होते. अध्यक्षीय भाषणात डॉ.अजयदादा धोंडे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये असताना विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रवेश संदर्भातील शाखेमधील प्रत्येक विषयाचा अभ्यास व्यवस्थित केला पाहिजे व्यवस्थित अभ्यास केला तर पुढे येणाऱ्या प्रत्येक परीक्षेमध्ये विद्यार्थी चांगले यश संपादन करू शकतो,विद्यार्थी औषध निर्माण कंपनी मधील मुलाखती असो किंवा इतर फार्मसी संदर्भातील परीक्षामध्ये यश संपादन करू शकतो विद्यार्थ्याला यश मिळते , चांगल्या प्रकारची नोकरी मिळते त्यामुळे विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जीवनामध्ये असताना अभ्यास करावा व आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे,अभ्यासाव्यतिरिक्त कॉलेजमध्ये होत असलेले वेगवेगळे कार्यक्रम यामधून विद्यार्थ्यांना आपले कला गुण दाखवता येतात व या कलागुणामुळे विद्यार्थी समाजामध्ये चांगले स्थान प्राप्त करतो व त्याच कलागुणांचा विद्यार्थ्यांना जीवनामध्ये खूप फायदाही होतो त्यामुळे कॉलेज जीवनामध्ये अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रम,स्पोर्ट,वेगळे स्पर्धा परीक्षामध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला पाहिजे असे डॉ.अजयदादा धोंडे यांनी सांगितले.या फार्मसी कॉलेजमध्ये गेल्या चार दिवस वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात आले पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी सर्व वेगवेगळ्या कलाकारांची वेशभूषा परिधान केली होती, दुसऱ्या दिवशी आपल्या संस्कृतीला धरून असलेले वेगवेगळ्या राज्यामधील पारंपारिक वेशभूषा त्यानुसार वेशभूषा परिधान केली होती.या दरम्यान विद्यार्थ्यांचा वेगवेगळे खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या,विद्यार्थ्यांनी या ठिकाणी स्वतः खाण्याचे पदार्थ तयार करून वेगवेगळे खाण्याचे पदार्थांचे दुकाने(स्टॉल) कॉलेजमध्ये लावली होती सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पदार्थाचा आस्वाद घेतला.रविवारी दिनांक २३ मार्च रोजी स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण,सांस्कृतिक कार्यक्रम झाला यामध्ये विद्यार्थ्यांनी नाटक, डान्स,गाणे समूहगीत,समूह डान्स असे वेगवेगळे प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.तसेच यावर्षी क्लास ऑफ द इयर २०२५ ची ट्रॉफी डी फार्मसी मध्ये द्वितीय वर्ष डी फार्मसी व बी फार्मसी मध्ये तृतीय वर्ष बी फार्मसी या क्लासने ट्रॉफी जिंकली या सर्व कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजमधील सर्व प्राध्यापक व इतर सहकर्मचारी यांनी केले होते व नियोजनबद्ध हा सर्व कार्यक्रम पार पाडला,या फार्मसी कॉलेजमध्ये अभ्यासाबरोबरच इतर ही कार्यक्रम घेतले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांना इतर कलागुण दाखवता येतात व अशा वेगवेगळ्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना जीवनामध्ये उपयोग होतो विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये चांगले यश मिळते व सामाजिक बांधिलकी ही विद्यार्थ्यांना यामधून समजते,यामुळे या कॉलेजमध्ये सर्व प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात असे कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी सांगितले .

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निषेधार्थ निटूरात शोले स्टाईल आंदोलन

# रखडलेली पाणी पुरवठा सुरु करण्याची आंदोलकाची मागणी पाणी पुरवठा सुरु नाही झाल्यास तीन फेब्रुवारी ला रास्ता रोको व गाव बंद आंदोलन होणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**





> निटूर ता निलंगा येथे झालेल्या आंदोलनास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता खरोसेकर, निलंगा प. स. पाणी पुरवठा विभागाचे कुंभार, निटूरचे तलाठी कुंभार, तसेच इ अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारले तसेच येत्या तीन फेब्रुवारी पर्यंत सर्व गावात उच्च दाबाने पाणी पुरवठा सुरु नाही झाला तसेच गावातील रस्त्याची दुरुस्ती नाही झाली तर निटूर मध्ये जीवन प्राधिकरण च्या विरोधात रास्ता रोको व गाव बंद आंदोलन करणार असल्याचे निवेदन या वेळी देण्यात आले.

गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली निटूरची पाणी पुरवठा योजना तात्काळ सुरु करावी तसेच पाईप लाईन खंदुन झालेली रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करावी या व इतर मागणीसाठी आज निटूर च्या सरपंच व ग्रामस्तानी शोले स्टाईल आंदोलन केले येत्या तीन फेब्रुवारी पर्यंत जर पाणी पुरवठा सुरु नाही झाला तर रास्ता रोको व गाव बंद आंदोलन करणार असल्याचा लेखी इशारा ही या वेळी देण्यात आला सलग दोन तास झालेल्या या आंदोलनामुळे या आंदोलनाला अनेक ग्रामस्थानी हजेरी लावली.निटूर ता. निलंगा येथे सर्वांना घरा घरात शुद्ध पाणी मिळावे या हेतूने केंद्र सरकारने तीन वर्षांपूर्वी दहा कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर केली खरी मात्र गेल्या तीन वर्ष्यापासून ही योजना संबंधित कंत्राटदार व त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे कार्यान्वित झाली नाही त्यामुळे नागरिकांचे पाण्यासाठी हाल होतं आहेत.

दरम्यान या संदर्भात निटूर ग्रामपंचायतने अनेक वेळा महाराष्ट जीवन प्राधिकरण कार्यलयला पाणीपुरवठा योजना पूर्ण करावी असा लेखी पत्रव्यवहार केला परंतु संबंधित कार्यालयाने कसलीच दखल घेतली नाही त्यामुळे आज निटूर च्या सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी यांच्या नेत्रत्वाखाली ग्रामस्थानी भर उन्हात दोनं तास आंदोलन केले.निटूर मध्ये पाईपलाईन च्या नावाखाली गावातील अनेक रस्ते उकरण्यात आले आहेत त्यामुळे रस्त्यावर सहज चालणे मुश्किल झाले आहे पाईप लाईन बुजवल्या नंतर त्यावर पॅच वर्क ही केले नाही त्यामुळे तीन वर्ष्यापासून नागरिकांचे हाल होतं आहेत त्यामुळे या तुघलकी कारभारा विरोधात आज सकाळी सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी तसेच उपसरपंच शिवराज सोमवंशी, ग्रामपंचायत सदस्य संदीप पाटील, दिनकर कवडे, श्रावण शिंदे, शिवाजी बाबर, शिवाजी व्यवहारे, तसेच महिला ग्रामपंचायत सदस्य यांनी प्रशासनाचा निषेध म्हणून शोले स्टाईल आंदोलन केले या वेळी महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्तिथ होते.

# ज्ञान अकॅडमीचा उपक्रम ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरेल भार्गव राजे








लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

):आधुनिक तंत्रज्ञानाने जग जवळ येत आहे त्यातच शैक्षणिक स्पर्धा वाढत असल्यामुळे स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञान अकॅडमीच्या माध्यमातून डॉ. विजयराव माने यांनी ब्राम्हणगाव सारख्या गावात उपक्रम राबविला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल असे विचार नांदेड येथील भार्गव करिअर अकॅडमी चे संचालक भार्गव राजे यांनी व्यक्त केले ते ब्राह्मणगाव येथे भाऊसाहेब माने शैक्षणिक, कृषी, पर्यावरण ग्रामिण विकास संशोधन संस्थाच्या प्रांगणात आयोजित ज्ञान अकॅडमीच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतानां बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. विजयराव माने हे तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड अर्चनाताई माने, सरपंच परमात्मा गरुडे, डॉ. राजेश देशपांडे, रत्नाकर मुक्कावार,,अरविन्द धबडगे,माधवराव कोथळकर, नयन पुदलवाड, संजय सावंत, सुनील देवसरकर, बापूराव माने, प्रदीप माने, श्रीधर देवसरकर, बालाजी वानखेडे यांची या उद्घाटन प्रसंगी उपस्थिती होती .

मार्गदर्शन करताना भार्गव सर पुढे म्हणाले की, प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबुत असल्यास भविष्यात स्पर्धा परीक्षा देताना कुठलीही अडचण निर्माण होत नाही त्यासाठी इयत्ता ८ वी ते १२ पर्यन्तच्या विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेण्याचा मोलाचा सल्ला दिला पुस्तकाशिवाय बाहेरचे कुठलेही प्रश्न परीक्षेमध्ये नसतात त्यामुळे पुस्तक

**ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना विद्येची उप देऊन झानार्जनाचे तूप निर्माण करू –डॉ. विजयराव माने**

वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचनाने मनाची एकाग्रता वाढते मेंदूची क्षमता भक्कम होते त्याचबरोबर मोबाईल मुळे मेंदूची क्षमता कमी होत असल्याने विद्यार्थ्यांनी मोबाईल पेक्षा वाचनावर भर द्यावा असे त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . गरीब कुटुंबातील मुलांनी चिकाटीने मेहनत केल्यास भविष्यात स्पर्धा परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन करून देशाचे शिखर गाठता येते

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात जाऊन शिक्षण घेणे व राहणे परवडणारे नसल्यामुळे ही सुविधा ब्राह्मणगाव येथे उपलब्ध करून दिल्यामुळे या संधीचा परीसरातील पालक वर्गाने व विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा व आपल्या पाल्यांचे भविष्य उज्वल करावे असे आव्हान भार्गव यांनी केले . ग्रामिण भागात गुणवत्ता भरपूर आहे परन्तु सोयीसुविधा उपलब्ध नसतात त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणामध्ये मागे पडतात त्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञान अकॅडमीच्या माध्यमातून ही संधी अँड अर्चनाताई विजयराव माने यांनी केल्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन तुम्हीच तुमच्या भविष्याचे शिल्पकार व्हा ! असे सांगून सध्या स्पर्धेचे जग असून विद्यार्थ्यांना सर्वच क्षेत्रात स्पर्धा पार पडावी लागते. स्पर्धेमध्ये विद्यार्थी टिकण्यासाठी कोडींग, रोबोटिक्स, ३ऊ प्रिंटिंग, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (–ख) या तंत्रज्ञानांमध्ये विद्यार्थांना देखील कौशल्य हस्तगत असणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे डॉ. विजयराव माने यांच्या दूरदृष्टीमुळे, अशा ङ्ढएच् प्रयोगशाळा विद्यार्थ्यांसाठी या वर्षी उपलब्ध होऊन या प्रयोगशाळेत विद्यार्थी प्रत्यक्ष कोडींग शिकतील, रोबोट तयार करतील, कृत्रिम बुद्धिमता विषयी आणि ३ऊ प्रिंटिंग च्या माध्यमातून वेगवेगळ्या अँप च्या माध्यमातून डिझाईन शिकून प्रतिकृती निर्माण करण्याचे प्रयोग करतील. जीवनात संघर्ष जो करतो तो खरा नशीबवान ठरतो असा मोलाचा संदेशही त्यांनी दिला आहे . यावेळी विद्यार्थिनींनी विचारलेल्या विविध प्रश्नांची सुलभ व सोप्या भाषेत समर्पक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांचे व पालकांचे समाधान केले कार्यक्रमाचे संचालन सुनील वानखेडे यांनी तर आभार प्रा .महेश पानपट्टे यांनी मांडले.

## मुदखेड तालुका पोलीस पाटील संघाच्या अध्यक्षपदी श्री.प्रकाश पाटील गोंदगे तर उपाध्यक्ष पदी श्री.आदिनाथ पाटील ढगे यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुदखेड । सदानंद शिंदे**



महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या माध्यमातून मुदखेड तालुका अध्यक्ष पदी श्री.प्रकाश पाटील गोंदगे (पो.पा,पाथरड)तर उपाध्यक्ष पदी श्री आदिनाथ पाटील ढगे(पो.पा,महाटी)यांची निवड करण्यात आली. तालुका सचिव म्हणून श्री.भागवत पाटील कोल्हे(पो.पा,सीता बोरगाव )तर सहसचिव पदी श्री.गोविंद रामजी वसुरे(पो.पा,मेंढका )कोषाध्यक्ष पदी साईनाथ शिवाजी पाटील दंडे(पो.पा,वैजापूर पार्डी) निवड करण्यात आली.तर महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष पदी सौ सारिकाताई व्यंकटी खानसोळे(पो.पा, शिखाचीवाडी) तर उपाध्यक्ष पदी सौ.गंगासागर गजानन सावळे(पो.पा,पांढरवाडी )यांची निवड करण्यात आली. मुदखेड पोलीस स्टेशन कार्यकारिणी प्रमुख म्हणून श्री.प्रताप पाटील पवार तर बारडचे पोलीस स्टेशन कार्यकारिणी प्रमुख म्हणून श्री.सदानंद गोविंदराव पाटील पवार यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ नांदेड जिल्हा अध्यक्ष श्री. भास्कर पाटील कंकाळ आणि जिल्हा सचिव श्री. संभाजी पाटील मांडगीकर यांनी निवड करून निवडीचे प्रमाणपत्र दिले. आणि नाव निर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले. या पोलीस पाटील निवडीच्या कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष म्हणून तालुका दांडाधिकारी तथा तहसीलदार श्री. आनंद देऊळगावकर सर उपस्थित होते तसेच मुदखेड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री. वसंत सप्रे साहेब आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे साहेब उपस्थित होते. पोलीस पाटील संघांचे मार्गदर्शक म्हणून डोणगावचे पोलीस पाटील श्री. राजेंद्र हांमद आणि आदर्श पुरस्कार सन्मानित बालाजी वाघमारे(पो.पा,मगरे पिंपळकौठा उपस्थित होते. कार्यक्रम मुदखेड पोलीस स्टेशन च्या सभागृहात पार पडला.

## रांजणगाव एम आय डी सी पोलिसांची जलद कारवाई; २४ तासांत सात आरोपींना अटक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर । प्रतिनिधी**




रांजणगाव एम आय डी सी पोलिसांनी जलद कारवाई करत डीजे हॉलमध्ये झालेल्या खून प्रकरणातील सात आरोपींना केवळ २४ तासांत अटक केली आहे. २३ मार्च २०२५ रोजी मध्यरात्री ९ वाजता एम आय डी सी परिसरातील एका डीजे हॉलमध्ये हा गुन्हा घडला होता. सुरुवातीला एका क्लबमध्ये वाद झाल्यानंतर हा वाद डीजे हॉलमध्ये वाढत गेला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. या भांडणादरम्यान रोहन गाडे या तरुणावर हल्ला करून त्याचा खून करण्यात आला.घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रांजणगाव एम आय डी सी पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. विशेष पथके तयार करून विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले आणि २४ तासांत सात आरोपींना अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शंकर जाधव (वय १९, कंढाळ, जि. सातारा), ओम दत्तात्रय चव्हाण (वय १८, धानोरी, जि. वाशीम), रोहन सुखदेव बोते (वय १८, श्रीरामपूर, जि. अहमदनगर), ओंकार विजय देशमुख (वय १८, विटा, जि. सांगली), विराज मोहिते (वय २०, तिवसा, जि. अमरावती), गौरव दिवटे (वय २२, कृष्णानगर, मुंबई) आणि सुरज पाटील (वय २०, शिराळा, जि. सांगली) यांचा समावेश आहे.

सर्व आरोपींना २५ मार्च २०२५ रोजी न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे न्यायालयाने त्यांना २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे पोलिसांचे कौतुक होत असून, नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास वाढला आहे.

## महामानव भारतरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मुख्य बाजारपेठेत जागा उपलब्ध करून द्यावी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव महादेव हरण**




सेनगाव शहरांमध्ये महामानव डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मुख्य बाजारपेठेत जागा उपलब्ध करून देण्यात यावी याकरिता सेनगाव नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी गांजरे, यांना निवेदन देण्यात आले आहे यावेळी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल देशमुख , कृषी उत्पन्न बाजार समितीचे डायरेक्टरअंकुश तिडके , सेनगाव नगरपंचायतीचे नगरसेवक शिलानंद वाकळे, साजिदभाई गौरव गवळी ,कृष्णा वाकळे ,यांच्यासह आदीनी निवेदन दिले आहे,

## सरकारने वाढवला खासदारांचा पगार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

केंद्र सरकारने लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांचे वेतन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. खासदारांच्या पगाराबरोबरच भत्ते आणि माजी खासदारांचे पेन्शन देखील वाढवण्यात आले आहे. ही वाढ १ एप्रिल २०23 पासून लागू होणार आहे. संसदीय कार्य मंत्रालयाने सोमवारी यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेनुसार लोकसभा आणि राज्यसभा सदस्यांचे वेतन एक लाख रूपयांनी वाढून १.२४ लाख रुपये प्रति महिना झाले आहे. तर दैनिक भत्ता हा २,००० रूपयांनी वाढून २,५०० रुपये झाला आहे.पगारासह माजी खासदारांचे पेंशन देखील २५,००० रुपये वाढवून ३१,००० प्रति महिना करण्यात आले आहे. याशिवाय पाच वर्षांपेक्षा जास्त सेवेसाठी अतिरिक्त पेन्शन २,००० हून वाढून २,५०० रुपये झाली आहे. हा निर्णय संसदेच्या बजेट सेशनदरम्यान घेण्यात आला आहे. यापूर्वी पगार आणि भत्त्यांमध्ये झालेली वाढ ही एप्रिल २०१८ साली करण्यात आली होती.२०१८ मध्ये खासदारांचे मूळ वेतन १ लाख रुपये महिना निश्चित करण्यात आले होते. याचा उद्देश त्यांचा पगार महागाई आणि उदरनिर्वाह यासाठी लागणाऱ्या खर्चात झालेली वाढ याच्या प्रमाणात असेल. २०१८ मध्ये केलेल्या बदलानुसार खासदारांना त्यांच्या भागात कार्यलय चालवण्यासाठी आणि लोकांना भेटण्यासाठी ७० हजार रुपयांचा भत्ता दिला जातो. याशिवाय त्यांना कार्यालयीन खर्चासाठी ६० हजार रुपये महिना आणि संसदेच्या अधिवेशनादरम्यान प्रत्येक दिवसी २ हजार रुपयांचा भत्ता दिला जातो. आता या भत्त्यांमध्येही वाढ करण्यात येईल.याशिवाय खासदारांना दरवर्षी फोन आणि इंटरनेटचा वापर करण्यासाठी देखील भत्ता दिला जातो, ते स्वतः किंवा त्यांचे कुटुंबिय वर्षात ३४ वेळा मोफत डोमेस्टिक फ्लाइट मधून प्रवास करू शकतात. ते कार्यालयीन कामासाठी किंवा खाजगी कामासाठी कधीही फर्स्ट क्लासने रेल्वे प्रवास करू शकतात. रस्त्याने प्रवास केल्यानंतर त्यांना इंधनाचा खर्च दिला जातो. खासदारांना दरवर्षी ५० हजार यूनिट वीज आणि ४ हजार किलोलीटर पाणी मोफत दिले जाते.सरकार त्यांच्या राहण्याची देखील सोय करते. खासदारांना दिल्लीत कोणतेही भाडे न देता मोफत घर मिळते. त्यांना त्यांच्या ज्येष्ठतेवरून हॉस्टेलचे रुम, अपार्टमेंट किंवा बंगला दिला जाऊ शकतो. जे खासदार सरकारी निवासस्थान घेत नाहीत त्यांना दर महिन्याला घराचा भत्ता दिला जातो.

## मुख्यमंत्र्यांची घोषणा! सौर कृषी पंप योजनेच्या नियमावलीत बदल, लाखो शेतकऱ्यांना होणार मोठा फायदा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये सौर कृषी पंप योजना मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय ठरली आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केली आहे.पाण्याची पातळी खालावलेल्या भागांमध्ये १० एचपी क्षमतेचे कृषी पंप बसविण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे त्यांनी विधानसभेत जाहीर केले.

**मुख्यमंत्र्यांची घोषणा**

या वर्षीच्या सौर कृषी पंप योजनेअंतर्गत १० लाख पंप बसविण्याचा मानस आहे. मात्र, काही भागांमध्ये पाणीपातळी खालावल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी ७.५ एचपी व १० एचपी पंप बसवण्यास परवानगी दिली जाईल. तथापि, ७.५ एचपीपर्यंतच अनुदान मिळेल, त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या पंपांसाठी अनुदान दिले जाणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांसाठी 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी किफायतशीर आणि टिकाऊ ऊर्जेचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने मागेल त्याला सौर कृषी पंप योजना राबवली आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर सौर कृषी पंप दिले जात असून, त्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.

**योजनेत सहभागी होण्यासाठी पात्रता निकष**

शेतकऱ्यांकडे सिंचनासाठी आवश्यक पाणी स्त्रोत असणे आवश्यक आहे.

शेततळे, विहीर, बोअरवेल किंवा बारमाही वाहणाऱ्या नदी/नाल्याच्या जवळील शेतकरी या योजनेसाठी पात्र ठरतील.

संबंधित क्षेत्रात शाश्वत पाणी उपलब्ध असल्याचे महावितरणद्वारे पडताळले जाईल.

'अटल सौर कृषी पंप योजना–१ व २' किंवा 'मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना'चा लाभ न घेतलेल्या शेतकऱ्यांना अर्ज करता येईल.

**ऑनलाइन अर्ज प्रक्रिया**

'SOLAR MTSKPY' पोर्टलला भेट द्या.

'सुविधा' टॅबवर क्लिक करून नवीन अर्ज भरा.

वैयक्तिक माहिती, पत्ता, शेती व बँक तपशील भरा.

अर्ज सबमिट केल्यानंतर पोहोच पावती मिळेल.

कोणत्याही अडचणीसाठी तालुका महावितरण उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

**सौर कृषी पंप योजनेचे फायदे**

विजेच्या खर्चात बचत

दिवसा शेताला पाणी उपलब्ध

शाश्वत सिंचनाची सुविधा

केंद्र व राज्य सरकारकडून आर्थिक मदत

**डिझेल व विजेच्या तुलनेत कमी खर्च**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी ही योजना अत्यंत लाभदायक ठरत असून, सरकारने घेतलेल्या नव्या निर्णयामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा मिळण्याची शक्यता आहे.

## नांदेड जिल्हातील सर्व रूग्णालयात व लॅबमध्ये दर्शनी भागात

# दर फलक लावणे बंधनकारक करून रुग्णांची होणारी लूट थांबविण्याची रवि राठोड यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा.मोरे**

उपचारादरम्यान रुग्णांकडून खाजगी रुग्णालय व्यवस्थापना सह रक्त तपासणी मनमानी शुल्कास आवर घालून प्रथम दर्शनी भागात दर फलक लावण्यास बंधनकारक करण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.नांदेड जिल्हातील सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या उपचारादरम्यान राजरोजपणे मनमानी शुल्क आकारणी करून रुग्णालय व्यवस्थापन समिती कडून रुग्णांची चालू असलेली आर्थिक लूट थांबून प्रथम तपासणी ते उपलब्ध सोई सुविधा नुसार शासन नियम व अटी घालून सेवा शुल्क आकारणी करून दर फलक रुग्णालय व्यवस्थापन समिती व रक्त तपासणी प्रयोग शाळेस ( ब्लड लॅब )मध्ये प्रथम दर्शनी भागात मराठी भाषेत फलक लावणे बंधनकारक करणे. व तसेच जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयाच्या व्यवस्थापन समितीकडून रुग्णांच्या उपचारादरम्यान राजरोसपणे नियमाला धाब्यावर बसून रुग्णांच्या व्यवस्थापन समिती कडून मनमानी सेवाशुल्क आकारणी करून सर्रास आर्थिक लूट सुरू असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आर्थिक दुर्बल घटक असलेल्या रुग्णांच्या जीवनमानावर परिणाम होत असल्या कारणाने रुग्णांची खाजगी रुग्णालयाच्या व्यवस्थापन समिती मार्फत सर्व स्तरावरील रुग्णांची होणारी लूट हे अत्यंत मोठ्या प्रमाणात निंदनीय असून जिल्ह्या मध्ये रुग्णां ची आर्थिक लूट सुरू असल्या कारणाने सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये नियम व अटी घालून सेवाशुल्क आकारणी करण्यास बंधन घालून रुग्णालयाच्या प्रथम तपासणी पासून ते उपलब्ध सोयी सुविधेनुसार रुग्णालयाच्या व्यवस्थापन समितीकडून आपण घेत असलेल्या उपचार व सोयी सुविधा सेवेची माहिती असणे रुग्णांचे अधिकार आहेत नियम व अटीच्या अधीन राहून सेवाशुल्क आकारणी करण्यास रुग्णालय व्यवस्थापन समितीने रुग्णालयाच्या प्रथम दर्शनी भागात मराठी भाषेत दर फलक लावण्याकरिता जिल्ह्यातील सर्व खाजगी रुग्णालय व्यवस्थापन समिती ला आदेशित करून व तसेच रक्त तपासणी प्रयोगशाळे ( ब्लड लॅब ) ला सुद्धा बंधनकारक करून जिल्ह्यातील रुग्णांचे होत असलेली आर्थिक लूट थांबून जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्व रुग्णांना न्याय द्यावा अशी विनंती निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी सह जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा चिकित्सक अधिकारी यांना मनसे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांनी मागणी केली आहे.



## सोनखेड येथील सार्वजनिक भीम जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब खिल्लारे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा. मोरे**

सोनखेड ता. लोहा जि. नांदेड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ३० एप्रिल रोजी मोठ्या उत्सवामध्ये साजरी केली जाते त्या अनुषंगाने जयंतीच्या कार्यकारणीची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीमध्ये सर्व समाज बांधवांच्या विचार विनिमयाने गेल्या अनेक दशकापासून सातत्याने समाजासाठी कार्य करणारे म्हणून ओळखले जाणारे युवक बाळासाहेब खिल्लारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे तर उपाध्यक्ष पदी दिलीप धुतराज, अमोल धुतराज (सचिव) गणेश धुतराज (सहसचिव) साहेब खिल्लारे (कोषाध्यक्ष) तर जयंती मंडळाचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून युवा पत्रकार अमोल खिल्लारे सदस्य किरण जोंधळे,एकनाथ सूर्यवंशी, रोहिदास भोरगे अशी समिती जाहीर करण्यात आली आहे जयंतीच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबवणे आरोग्य शिबीर घेणे रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करणे असे विविध कार्यक्रम राबविण्यामध्ये ते अग्रेसर असतात याही वर्षी विविध उपक्रम राबवून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करणार असल्याची माहिती यावेळी बाळासाहेब खिल्लारे यांनी दिली जयंती मंडळाचे अध्यक्ष झाल्याने त्यांच्यावरती विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## श्रीगोंद्यांचे दुय्यम निबंधक सचिन खताळ पाच हजार लाच स्वीकारताना लाचलुचपतच्या जाळ्यात अडकल्याने खळबळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तक्रारदार हे खरेदी विक्री व्यवसाय करत असल्याने त्यांची दुय्यम निबंधक कार्यालयात नियमित दस्त नोंदणी होत असते. त्यांच्याकडे दुय्यम निबंधक यांनी दस्त नोंदणीसाठी पाच हजार व मागील दस्त नोंदणीची बाकी दहा हजार असे पंधरा हजार रुपये दिल्यानंतरच दस्तांची नोंद होईल असे सांगत पंधरा हजार रुपयांची मागणी केली असता तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली. त्या अनुषंगाने लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून तक्रारदार यांच्याकडुन पाच हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना श्रीगोंदा दुय्यम निबंधक सचिन खताळ यांना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले. हि घटना बुधवारी दिनांक २६ मार्च रोजी संध्याकाळी घडली. दुय्यम निबंधक सचिन खताळ याच्या विरोधात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. एकाच महिन्यात लाचलुचपत विभागाची श्रीगोंदा तालुक्यात हि दुसरी कारवाई झाल्याने शासकीय कर्मचाऱ्यात एकाच खळबळ उडाली आहे

श्रीगोंदा तालुक्यातील सरकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांवर कोणाचाही वचक नसल्याने त्यांना कोणाचीही भीती उरलेली नाही त्यामुळे सर्व काही आलबेल असल्याने कर्मचारी नागरिकांना वेठीस धरत असुन नागरिकांची कामे होत नाहीत. त्यामुळे लोकप्रतिनिधी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी अधिकाऱ्यावर अंकुश ठेवण्याची गरज निर्माण झाली असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे



## डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने उमरी बंद व अर्ध नग्न आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेना संघटनेचे मराठवाडा सचिव,किशोर कवडीकर यांच्या नेतृत्वाखाली डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना आणि स्थानिक व्यापाऱ्यांच्या वतीने दि.२६ मार्च रोजी उमरी येथे जोरदार आंदोलन करण्यात आले असुन दुपारी दोन वाजता प्रमुख मागण्यांचे निवेदन उमरी स्टेशन चे पोलिस निरीक्षक मा.अंकुश माने सर यांच्या उपस्थितीत नगर पालिका कार्यालयीन अधीक्षक कांचन पडलवार यांना निवेदन देण्यात आले असून या आंदोलनाला उपस्थित डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते नगरपालिकेच्या मनमानी कारभाराविरोधात तीव्र आवाज उठवत, व्यापाऱ्यांना होणारा अन्याय थांबवा! असा ठाम इशारा नगर पालिका प्रशासनाला देण्यात आला. व्यापाऱ्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष केल्यास पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे आज या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उमरीतील सर्व दुकाने आणि बाजारपेठा बंद ठेवण्यात आले होते.यावेळी उपस्थित संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय वाघमारे बोथीकर, जिल्हा प्रवक्ते पी.एन. धसाडे सर, कु.प्रियंका गायकवाड सामाजिक कार्यकर्ती, नायगाव तालुका अध्यक्ष अक्षय बोयाळ,धर्माबाद तालुकाध्यक्ष अनिल जुळणे,उमरी शहराध्यक्ष संतोष नामेवार , तालुका सचिव राम बोईवर ,सोनटक्के मुदखेड, पत्रकार , पत्रकार शिवराज मोकमपले, बंडू सावंत यांच्यासह व्यापारी वर्गातून दयालसिंग बावरी ,मोहन सिंग बावरी दाऊ गंगासागरे, अखिल शेख, ठाकूर , माधव गायकवाड, अनुसया कटकदवणे , सुशिलाबाई गायकवाड, शिल्पा वायचळकर,मधुकर गायकवाड यांच्यासह मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांनी एकजूट दाखवत आपल्या हक्कांसाठी संघर्ष केला. या बंदला नागरिकांनीही उत्स्फूर्त पाठिंबा दिला, आणि या आंदोलनाला उमरी तालुक्यातील काँग्रेस चे पदाधिकारी मा.दासा पाटील यांनी पाठिंबा देऊन आपले विचार मांडले आणि हा विषय नांदेड जिल्हाचे खासदार मा.प्रा.रविंद्रजी चव्हाण साहेबांना सांगुन हा विषय मार्गी लावू असा शब्द त्यांनी दिला व या मोर्चाला जाहीर पाठिंबा दर्शविला त्याच बरोबर धर्मविर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान चे जिल्हा प्रमुख मा.हर्षवर्धन देशमुख यांनी मोर्चात सहभागी होऊन पांठिंबा दिला व भिम आर्मी जिल्हा अध्यक्ष मा.स्वप्निल भोसीकर, पत्रकार संरक्षण समिती चे तालुका प्रमुख मा.अशोक झडते,भिम शक्ती तालुकाध्यक्ष मा.बालाजी देवके, बहुजन जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष किशोर करडे या सर्व संघटनेने मोर्चात सहभागी होऊन पाठिंबा दर्शविला आहे.



## कै बापूराव पाटील कदम करकाळेकर यांच्या स्मरणार्थ वासंतिक कथायन संपन्न




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पाटील वडजे**

श्री यशवंतराव ग्रामविकास व शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित वासंतिक कथायन कै बापुराव पाटील कदम करकाळेकर कथानगरी करकाळा ता.उमरी जि.नांदेड येथे संपन्न झाला.याप्रसंगी

करकाळा येथे महाराष्ट्रातील असंख्य साहित्यिक गावात आले असता व्ही.पी.के.उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांनी मार्गदर्शन केले तसेच सत्राचे अध्यक्ष प्रा.डॉ. शंकर विभुते,प्रमुख पाहुणे श्री देवीदास फुलारी,प्रा. महेश मोरे आयोजक श्री दिगंबर कदम यांच्या उपस्थितीत अनुपमा बन,रोहिणी पांडे,रूचिरा बेटकर,राम तरटे यांनी विविध आशयाच्या कथाकथन करून श्रोत्यांना कधी हसवून तर कधी रडवून सोडले.दोन तास कधी संपले कळलेच नाही. यावेळी रघुनाथ पाटील कदम आनंद कदम,मल्लू कमळे,साहेबराव कदम,संतोष कदम,उत्तम कदम,व्यंकट पाटील,दिलीप सावंत व महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.सूत्रसंचालन राम तरटे यांनी केले तर आभारप्रदर्शन दिगंबर कदम यांनी मानले.

## सरपंच अशोक इंगळे यांना समाज रत्न पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील साखरा येथील रहिवाशी असलेले तथा सरपंच मा, अशोकराव इंगळे यांना दि २६ मार्च रोजी, मुकेश भाई निकाळजे मित्र मंडळ खरपुडी जालना यांच्या वतीने समाज रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला असून सरपंच अशोक इंगळे यांनी समाजाकरिता व न्याय हक्का करिता रस्त्यावर उतरून अनेक आंदोलने मोर्चे या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे व आंबेडकरी चळवळीत ज्यांची सेनगाव तालुक्यामध्ये महत्त्वाची भूमिका असणारे अशोक इंगळे यांना मुकेश भाई निकाळजे मित्र मंडळाकडून समाज रत्न पुरस्कार जाहीर करण्यातआला व भंते कश्यप ली (योगा व ध्यान प्रशिक्षक) यांच्या हस्ते देण्यात येणार आल्याने जिल्ह्यामधून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे तर ३० मार्च रोजी क्रिकेट मैदान खरपुडी जालना येथे सायंकाळी सहा वाजता देण्यात येत आहे पुरस्कार आयोजक मुकेश भाई निकाळजे मित्र मंडळ खरपुडी जालना यांनी केले असून समाज रत्न पुरस्कार मिळाल्याने सरपंच अशोक इंगळे यांना जिल्हाभरातून शुभेच्छा मिळत आहेत, व त्यांचे सुदामा फाउंडेशन चे उपाध्यक्ष गौरव गवळी यांनी त्यांचे कौतुक केले.




## जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र तर्फे दावते इफ्तार पार्टी संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । राकेश साळवी**

जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रच्या मंगळवार दिनांक २५ मार्च रोजी फातिमा दलखानिया ग्राउंड, मीरा रोड पूर्व येथे दावते इफ्तार पार्टीचं आयोजन करण्यात आलं होतं. सदर प्रसंगी डी सी पी प्रकाश गायकवाड,सय्यद आफ्रिन एम हुसेन, नयानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जगदाळे, मुफ्ती, जकी पटेल, साजिद पटेल, ॲड. शहूद अन्वर, रमजान खत्री, सना देशमुख, मुस्तफा बनारा, अंकुश मालुसरे, एजाज खतीब, निलेश सोनी, नवीन श्रीवास्तव, प्रदीप जंगम, उमर फ्रुटवाला यांच्यासह शहरातील विविध पक्षांचे पदाधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांसह सर्वधर्मीय बांधवानी आपली उपस्थिती दर्शविली.

या प्रसंगी आयोजक जे यू एम चे मिरा भाईंदर अध्यक्ष निलेश फापाळे,सरचिटणीस शकील अहमद, उपाध्यक्ष सोहिल चौरसिया, खजिनदार मेहबूब कुरेशी, प्रभारी सतीश साटम, इंग्लिश खान ,प्रवीण कांबळी, आबाजी सावंत,निरंजन नवले,राकेश साळवी, प्रवीण मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904